जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID** : crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

**प्रेसनोट क्रमांक - ५५० दिनांक - ३०/१२/२०२४**

हडपसर पोलीस स्टेशन,पुणे शहर

## जबरीने मोबाईल लुटणा-या तिघांना केले जेरबंद

फिर्यादी हे डी.पी.रोड वरुन भगीरथी नगर सोसायटीकडे पायी जात असताना दुचाकीवरून आलेल्या ३ अनोळखी इसमांपैकी पाठीमागे बसलेल्या इसमाने फिर्यादी हातातील मोबाईल जबरदस्तीने हिसकावला. त्यास फिर्यादी यांनी विरोध केला असता गाडीवरील इसमांनी त्यांना २०० ते ३०० मीटर फरुफटत नेले, त्यामध्ये फिर्यादीच्या डाव्या पायाला तसेच दोन्ही गुडघ्यांना दुखापत झाली. तसेच गाडीवरील पाठीमागे बसलेल्या इसमाने फिर्यादीस हाताला चावुन जखमी केले त्याबाबत हडपसर पोलीस स्टेशन गु.र.नं १९०८/२०२४ भारतीय न्याय संहीता कलम ३०९(६) प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला होता.

दाखल गुन्ह्याचा तपास हडपसर पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस पोलीस निरीक्षक श्री. संतोष पांढरे, यांच्या मार्गदर्शनाप्रमाणे व सुचनांप्रमाणे करीत असताना, गुन्ह्याचे घटनास्थळ असलेले भागातील सीसीटीव्ही फुटेज तपास पथक अधिकारी सहा. पोलीस निरीक्षक अर्जुन कुदळे,पोलीस उप-निरीक्षक महेश कवळे, , अंमलदार कुंडलीक केसकर, चंद्रकांत रेजितवाड यांनी सीसीटीव्ही पाहीले. त्यामध्ये संशयीत ३ इसम दिसून आले. संशयीत फुटेजचा माग काढत सुमारे १०० हून अधिक प्राप्त सीसीटीव्ही फुटेजच्या मदतीने आरोपींची ओळख पटवण्यात आली. त्याआधारे तपास पथकास मिळालेल्या गोपनीय माहीतीचे आधारे आरोपी नामे **१) मंथन त्रिलोक पवार वय १९ वर्ष रा. सुगंगा हार्डवेअर मागे, क्रांती चौक, सर्वोदय कॉलनी मुंढवा पुणे. २) रोहीत किरण वाणी वय २१ वर्ष रा. स.नं ८९, ताडीगुत्ता चौक, ओंकार गॅरेज शेजारी, धायरकर वस्ती मुंढवा पुणे. ३) कृष्णा संजय वाणी वय २० वर्ष रा. सदर** यांना ताब्यात घेतले. त्यांचेकडे गुन्ह्याचे अनुषंगाने चौकशी करता त्यांनी गुन्हा केल्याची कबुली दिली. आरोपींकडून त्यांनी गुन्ह्यातील जबरदस्तीने चोरून नेलेला मोबाईल व गुन्हा करण्यासाठी वापरलेली दुचाकी असा किं.रू ७०,०००/- चा माल जप्त करण्यात आला आहे. दाखल गुन्हयाचा पुढील तपास सहा.पोलीस निरीक्षक अर्जुन कुदळे हे करीत आहेत.

सदरची कामगिरी ही मा.अप्पर पोलीस आयुक्त,पुर्व प्रादेशिक विभाग, श्री. मनोज पाटील, मा. पोलीस उप आयुक्त,परि. ५ पुणे श्री. डॉ.राजकुमार शिंदे, मा. सहा. पोलीस आयुक्त, हडपसर विभाग पुणे श्रीमती अश्विनी राख यांचे मार्गदर्शनाखाली, हडपसर पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस पोलीस निरीक्षक श्री.संतोष पांढरे, पोलीस निरीक्षक (गुन्हे), श्री.निलेश जगदाळे, श्री.अमर काळंगे,यांचे सुचनांप्रमाणे तपास पथकाचे सहा.पोलीस निरीक्षक अर्जुन कुदळे, पोलीस उप निरीक्षक महेश कवळे, पोलीस अंमलदार संदीप राठोड, सचिन जाधव, दिपक कांबळे, कुंडलीक केसकर, चंद्रकांत रेजितवाड, प्रशांत दुधाळ, निखील पवार, यांनी केली.


महाराष्ट्र पोलीस